भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
वैद्यकिय आरोग्य विभाग

प्रस्तावना :-

विषय :- भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे १९ नागरी आरोग्य केंद्र, बीजीपी दवाखाना/UCHC करीता सन २०२४-२५ या वर्षात औषधे वैद्यकिय साहित्य ई-निविदेनुसार खरेदीकरणेकामी दर मागविणेबाबत.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या १७ नागरी आरोग्य केंद्र व बीजीपी दवाखाना/ UCHC करीता सन २०२४-२७ या वर्षात सर्वसाधारण औषधे/वैद्यकिय साहित्य खरेदीसाठी राज्यस्तरीय वर्तमानपत्रात जाहीर प्रसिध्दी देवून व महाराष्ट्र शासनाच्या www. Mahatender.gov.in या संकेत स्थळावर ई-निविदा मागवून औषध भांडारपाल यांच्या अहवालानुसार २०७ बाबींकरीता दर निश्चित करणे आवश्यक आहे.

सबब महानगरपालिकेचे सन २०२४-२२७ या वित्तीय वर्षाचे अर्थसंकल्पात रू. ३०० लक्ष तरतुद मंजुर करणेत आलेली आहे. सबब अत्यावश्यक सेवेच्या दृष्टीकोनातुन १९ नागरी आरोग्य केंद्र व बीजीपी दवाखाना/ UCHC करीता तुर्तास सन २०२४-२७ या वर्षात सर्वसाधारण औषधे/वैद्यकिय साहित्य खरेदीसाठी ई-निविदा नुसार दर मागविणेसाठी सादर केलेल्या प्रस्तावास सध्या मा. मुख्य लेखापरिक्षक, मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच मा. अति. आयुक्त यांनी केलेल्या शिफारशी प्रमाणे मा. आयुक्त महोदय यांनी त्यास दि. १७/०३/२०२४ रोजी मान्यता दिलेली आहे. यास्तव सन २०२४-२७ या वित्तीय वर्षात "मनपा दवाखाना/आरोग्य केंद्रांकरीता औषध व साहित्य खरेदी" या लेखाशिर्षातंर्गत रू. ३०० लक्ष तरतुद ठेवणेत आलेली आहे. सबब सदरची औषध वैद्यकिय साहित्य खरेदी करणेकामी मंजुर अर्थसंकल्पीय तरतुद विचारात घेऊन पुढील कालावधीत वार्षिक खरेदीसाठी अर्थसंकल्पीय तरतुदीला अधिन राहून प्रस्तावास स्वतंत्रपणे मंजुरी घेणेत येईल. मात्र तुर्तास अत्यावश्यक सेवेच्या दृष्टीकोनातुन औषधे/वैद्यकिय साहित्याचे निविदानुसार दर मागविणेकामी प्रशासकिय मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

ठराव क्र. ४६२

दिनांक २९/०८/२०२४

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे १७ नागरी आरोग्य केंद्र, बीजीपी दवाखान्याकरीता सन २०२४-२७ या वित्तीय वर्षामध्ये रूग्णांचे उपचारासाठी सर्वसाधारण औषधे/वैद्यकिय साहित्य व साधन सामुग्रीची आवश्यकता असल्याने त्याकामी

औषधे/वैद्यकिय साहित्य/साधन सामुग्री खरेदी करणेकामी ई-निविदा प्रसिध्द करून २०७ बाबीचे दर मागविणेकामीचे प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, सन २०२४-२५ या वित्तीय वर्षाकरीता महानगरपालिकेचे १९ नागरी आरोग्य केंद्र व बीजीपी दवाखाना/UCHC येथील रूग्णांकरीता लागणारी औषधे/वैद्यकिय साहित्य/साधन सामुग्रीचे सन २०२४-२५ चे अर्थसंकल्पीय तरतुदीस अधिन राहुन दर मागविणेकामी सन २०२४-२५ ची २०७ बाबींची निविदा प्रसिध्द करणेसाठी मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

f:\ashok jadhav 20-6-2020\lm\e-tender 2024-25\medicine\prastavana1.docx2